MHAH080001452014

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १९९/१९९५</u>**
**<u>मधील अर्ज (नि.३२२) वरील आदेश</u>**

*(लक्ष्मण रभाजी वाघ*
***विरुध्द***
*रंगनाथ रभाजी वाघ व इतर)*

**<u>(दिनांक २४/०९/२०२५ रोजी)</u>**

सदरचा अर्ज वादी यांनी दाव्याकामी मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर करिता पंचायत समिती, संगमनेर तर्फे ग्रामसेवक पळसखेडे, दिपक चंदु तायडे यांना प्रतिवादी क्र. ६ म्हणुन सामिल करण्यासाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम कलम १८० प्रमाणे नोटीस देणे आवश्यक असतांना सदर नोटीस वेव्ह करुन सदर पक्षकारास प्रतिवादीपणात सामिल करण्याची परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. १अ ते १ड तसेच, प्रतिवादी क्र. ३ व ४ चे वारस यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेऊन सदर ग्रामपंचायत आवश्यक पक्षकार नाही व अर्जात दिलेले कारण संयुक्तिक नाही असे कथन करुन अर्ज रद्द व्हावा अशी विनंती केली आहे.

**०३.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी निशाणी ३१४ अन्वये सदर मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर करिता पंचायत समिती, संगमनेर तर्फे ग्रामसेवक पळसखेडे, दिपक चंदु तायडे यांना प्रतिवादीपणात सामिल करण्यासाठी मागितलेली दुरुस्तीची परवानगी नाकारण्यात आली आहे. त्यामुळे सदर पक्षकार यांना प्रतिवादीपणात सामिल करण्याची परवानगी न दिल्याने त्यांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम

कलम १८० प्रमाणे नोटीस देण्याची आवश्यकता नसल्याने पुढील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

| **<u>–आदेश–</u>** |
| --- |
| अर्ज (**नि.३२२**) नामंजूर करण्यात येतो. |

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE

Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2025.09.24 18:06:12 +0530

संगमनेर. **(श्रीमती एस. बी. ढवळे.)**
दिनांकः– २४/०९/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
संगमनेर.